लोकमत

## महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-१
## राष्ट्रीय सेवायोजन कक्षाकरिता मंत्रालयीन स्तरावर निर्माण केलेले राज्य संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी हे पद भरण्याबाबत.

राष्ट्रीय सेवा योजनेचे काम पाहण्यासाठी केंद्र शासनाच्या निर्देशानुसार मंत्रालयात स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यात आलेला आहे. या कक्षाचे संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी हे पद केंद्र शासनाच्या निकषानुसार भरावयाचे आहे. सदर पदाची पात्रता खालीलप्रमाणे केंद्र शासनाने निर्धारित केलेली आहे.

1. He/She should have served as programme Co-ordinator in the University or Programme Officer in a college at least for four years continuously.
2. He/She should possess the academic qualifications for being appointed as programme Co-ordinator as prescribed by the Ministry of Youth Affairs and sports, Government of India.
3. He/She should have interest in Youth work in particular and social work in general.

तसेच इतर अटी खालीलप्रमाणे आहेत.

१. संपर्क अधिकारी हे पद सहयोगी प्राध्यापक (Associate Professor) (सुधारित वेतनश्रेणी रुपये १३१४००-२१७१००) या संवर्गातील राहील.
२. त्यांचे मराठी, हिंदी आणि इंग्रजी या भाषेवर प्रभुत्व असावे.
३. पात्र उमेदवारांची प्रतिनियुक्तीने वा कंत्राटी पद्धतीने प्रथमतः एक वर्षासाठी नियुक्ती करण्यात येईल आणि त्यानंतर त्या व्यक्तीच्या कामाचा आढावा घेऊन मुदतवाढ देता येईल.
४. पात्र उमेदवाराची नियुक्ती मंत्रालयीन आस्थापनेवर असेपर्यंत त्याला शिक्षण विभागाच्या दीर्घ मुदतीचे रजेचे नियम लागू न होता सर्वसाधारण शासकीय कर्मचाऱ्यांचे रजेचे नियम लागू होतील.
५. पात्र उमेदवारांची नियुक्ती प्रतिनियुक्ती पद्धतीने जरी होत असली तरीही त्याची सेवा स्वीयेत्तर (Foreign Services) समजली जाणार नाही आणि म्हणून त्या व्यक्तीला कोणत्याही प्रकारचा प्रतिनियुक्ती भत्ता (Deputation Allowances) अनुज्ञेय राहणार नाही. फक्त वर दिलेल्या वेतनश्रेणीत महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार त्यांचे वेतन नियमित केले जाईल.
६. पात्र उमेदवाराला राष्ट्रीय सेवा योजनेसंबंधी सर्व प्रकारची प्रशासकीय कामे, विद्यापीठांना वेळेवर अनुदान मंजूर करणे, मंजूर केलेल्या अनुदानाचे लेखा परीक्षण करणे आणि केंद्र शासन विभागीय केंद्र पुणे आणि राज्यातील सर्व विद्यापीठांशी योग्य समन्वय साधावा लागेल. तसेच राज्यातील प्रत्येक विद्यापीठाच्या सल्लागार समितीचा पदसिद्ध सदस्य म्हणून प्रत्येक विद्यापीठाच्या सल्लागार समितीच्या बैठकीस उपस्थित राहावे लागेल व वेळोवेळी निर्देशित केलेली कामे पार पाडावी लागतील.
७. पात्र उमेदवार मुंबई बाहेरील असल्यास त्याला स्वतःला त्याच्या निवासस्थानाची व्यवस्था करावी लागेल, त्याची जबाबदारी शासनावर राहणार नाही.

वरील अटी विचारात घेऊन राज्यातील पात्र उमेदवारांनी सदर जाहीरात प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत आपले अर्ज आपल्या कार्यक्षेत्रातील संबंधित अकृषी विद्यापीठाकडे आपल्या नियुक्ती प्राधिकाऱ्यामार्फत सादर करावेत. तसेच सदर अर्जासोबत आपले मागील ५ वर्षांचे गोपनीय अहवाल, सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्रतिवेदन व पुनर्विलोकन केलेले अर्जासोबत जोडण्यात यावीत.

(डॉ. धनराज माने)
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

DGIPR 2022-23/C791